नि.फौ.ख.क्र. ११८/२०२२ नि.क्र. ३१

**फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) प्रमाणे आरोपीचे निवेदन**

आरोपी क्र.१ चे नाव: सतिष भगवान वैराळ

वय : ३६ वर्षे

राहणार : हल्ली रा. उरुळी कांचन, पुणे.
पूर्वी रा. मौर्य मेडिकल जवळ, बोल्हेगाव, अहमदनगर

[टिपः– संबंधित प्रश्न तयार करणेकामी प्रस्तुत न्यायालयाने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३(५) नुसार अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती सीमा शेख आणि आरोपीतर्फे वकील श्री. आर. पी. शेलोत यांचे सहाय्य घेतले असून, माननीय सर्वोच्च न्यायालयाचे राज कुमार वि. सरकार 2023 SCC OnLine SC 609 मधील न्यायनिर्देशांची पूर्तता केलेली आहे.]

प्र.क्र. १ तुमच्या विरुध्द आलेल्या पुराव्याबाबत आपणास खालील प्रश्न विचारण्यात येत असून त्याची उत्तरे देणे तुम्हास बंधनकारक नाही आणि प्रश्नाची उत्तरे न दिल्यास तुमच्यावर कोणतीही कारवाई होणार नाही. परंतु प्रश्नाच्या उत्तरात आपल्या विरुध्द एखादी बाब आढळून आल्यास ती बाब पुरावा म्हणून ग्राहय धरण्यात येईल. सदरची बाब तुम्हास समजली काय ?

उत्तर. होय.

प्र.क्र. २ अभियोग पक्षातर्फे नोंदविण्यात आलेल्या साक्षीदारांची साक्ष आपणास समजली काय ?

उत्तर. होय.

प्र.क्र. ३ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ स्वाती सतिष वैराळ यांच्या साक्षीत असे आले आहे की, तुम्ही त्यांचे पती असुन दि. ०६/०९/२०२१ रोजी रात्री ७.३० वाजता त्या व त्यांची आई त्यांची मुले आणण्यासाठी तुमच्या आजीच्या घरी लक्ष्मीनगर, तपोवन येथे गेल्या होत्या, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ४ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की,

त्यावेळेस तेथे तुम्ही, त्यांचे सासू सासरे व आजी सासू होती, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ५ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, तेथे तुम्ही त्यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली व त्या शिवीगाळ करू नका असे म्हटल्या असता तुम्ही लोखंडी रॉडने त्यांचे व त्यांच्या आईच्या डोक्यात मारले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ६ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यानंतर त्या पोलीस स्टेशनला गेल्या, पोलिसांनी त्यांना सिव्हील हॉस्पीटल येथे पाठवले, सिव्हील हॉस्पीटलमधून आल्यानंतर त्यांनी फिर्याद (नि.११) दिली, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. माहिती नाही.

प्र.क्र. ७ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ संगिता उल्हास ठोकळ यांच्या साक्षीत असे आले आहे की, त्यांच्या मुलीचे लग्न २०१२ मध्ये तुमच्या सोबत झाले, तुम्ही त्यांचे जावई आहात, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. होय.

प्र.क्र. ८ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, लग्न होताना तुम्ही तुमचे शिक्षण कॉम्प्युटर इंजिनियर असे सांगितले होते, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. होय.

प्र.क्र. ९ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, लॉकडाऊनमध्ये मुलीला व तुम्हाला त्यांनी त्यांच्याकडे आणले होते, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. नाही.

प्र.क्र. १० अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की,

तुम्हाला दोन मुले आहेत, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. होय.

प्र.क्र. ११ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, दि. ०६/०९/२०२१ रोजी रात्री ७.३० वाजता त्या व त्यांची मुलगी तुमच्या आजीच्या घरी लक्ष्मीनगर, तपोवन रोड, येथे नातवंडांना आणण्यासाठी गेल्या होत्या, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. १२ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यांच्या घरी त्या गेल्या असता तुम्ही व तुमची आई तेथे हजर होते, तुम्ही त्यांना शिव्या देण्यास सुरूवात केली, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. १३ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यावेळी तुम्ही दारू पिलेले होते, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. १४ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, तुम्ही आईवरुन शिवीगाळ करत होते, तुम्ही त्यांचे केस धरुन खाली पाडले, त्यांना व त्यांच्या मुलीला तुम्ही लोखंडी रॉडने डोक्यात मारले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. १५ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्या दोघीही रक्तभंबाळ झाल्या होत्या, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. १६ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, तेथून त्या पोलीस स्टेशनला गेल्या, पोलिसांनी त्यांना उपचारासाठी यादी दिली, त्यांनी सिव्हील हॉस्पीटलला जाऊन उपचार घेतले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. १७ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यांच्या मुलीने फिर्याद दिली, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. १८ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यानंतर त्या डॉ. सागर बोरूडे यांच्या नागापूर येथील हॉस्पीटलमध्ये गेल्या होत्या, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. माहिती नाही.

प्र.क्र. १९ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, घटना तुमच्या आजीच्या घरात घडली, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. २० अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, तुम्ही त्यांना शिवीगाळ घरात केली व लोखंडी रॉडने मारहाण घराच्या बाहेर केली, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. २१ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ डॉ. विश्वनाथ कुंडलिकराव काकडे यांच्या साक्षीत असे आले आहे की, दि. ०६/०९/२०२१ रोजी ते वैद्यकिय अधिकारी म्हणुन सरकारी दवाखान्यात कार्यरत होते, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. माहिती नाही.

प्र.क्र. २२ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ याचे साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यादिवशी त्यांचेकडे संगिता उल्हास ठोकळ आणि स्वाती सतिष वैराळ या पोलीस यादीसह उपचारासाठी सरकारी दवाखान्यात आल्या होत्या, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. माहिती नाही.

प्र.क्र. २३ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ यांचे साक्षीत पुढे असे आले आहे की, संगिता उल्हास ठोकळ व स्वाती सतिष वैराळ यांनी त्यांना दि. ०६/०९/२०२१ रोजी रात्री ८.०० वा. मारहाण झाल्याबाबत सांगितले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. २४ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यांना अनुक्रमे रात्री ९.०० व रात्री ९.१० वा. तपासले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. माहिती नाही.

प्र.क्र. २५ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, स्वाती सतिष वैराळ हिला डोक्याच्या वरच्या भागावर जखम झाली होती, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. माहिती नाही.

प्र.क्र. २६ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, संगिता उल्हास ठोकळ हिला डोक्याच्या बाजुला म्हणजेच कानाच्या वर आणि कपाळाच्या मागे असलेल्या भागावर जखम झाली होती, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. माहिती नाही.

प्र.क्र. २७ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, सदर दोन्ही रुग्णांना जखम टणक व कठिण हत्याराने होऊ शकते, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. २८ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, सदर जखमा २४ तासाचे आतील होत्या, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. २९ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की,

त्याप्रमाणे त्यांनी दोन्ही रुग्णांना वैद्यकिय प्रमाणपत्र (नि.१६ व १७) दिले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. माहिती नाही.

प्र.क्र. ३० अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ योगेश गोरक्षनाथ चव्हाण यांच्या साक्षीत असे आले आहे की, सन २०२१ मध्ये ते तोफखाना पोलीस ठाणे येथे पोलीस नाईक या पदावर कार्यरत होते, त्यादिवशी ते गुलमोहर पोलीस चौकी येथे तपासी अंमलदार म्हणून कार्यरत होते, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. माहिती नाही.

प्र.क्र. ३१ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, सदर गुन्हयाचा तपास त्यांच्याकडे देण्यात आल्याचा निरोप त्यांना मिळाला, त्यानुसार त्यांनी पोलीस स्टेशनला जावून सदर गुन्हा तपासासाठी लेखी ओदश (नि.२१) घेतला, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. माहिती नाही.

प्र.क्र. ३२ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यासोबत त्यांना दैनिक अहवाल, एफआयआरची प्रत, एमएलसी, दवाखाना यादी, फिर्यादी व जखमीचे उपचाराचे केस पेपर देण्यात आले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. माहिती नाही.

प्र.क्र. ३३ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, दि. ०७/०९/२०२१ रोजी घटनास्थळ पंचनामा (नि.२२)केला, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. माहिती नाही.

प्र.क्र. ३४ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यानंतर साक्षीदारांचे जबाब नोंदवले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. माहिती नाही.

प्र.क्र. ३५ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की,

सरकारी दवाखान्यात वैद्यकीय प्रमाणपत्र मिळणेकामी पत्र (नि.२३) दिले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. माहिती नाही.

प्र.क्र. **३६** अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, फिर्यादीने खाजगी दवाखान्यात उपचार घेतले संबंधीचे कागदपत्र प्राप्त केले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. माहिती नाही.

प्र.क्र. **३७** अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, फिर्यादीने खाजगी दवाखान्यात उपचार घेतले संबंधीचे कागदपत्र प्राप्त केले त्यानंतर तुम्हाला गुन्हयातील वापरलेले हत्यार पोलीस स्टेशनला हजर करण्याबाबत नोटीस (नि. २४) दिली, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. माहिती नाही.

प्र.क्र. **३८** अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, तुम्ही सदर हत्यार पोलीस स्टेशनला जमा न केल्याने तुमच्या विरुद्ध भा.द.वि. कलम २०१ वाढीव कलम लावण्यात आले, याबाबतचे पत्र (नि.२५) वर दाखल केले आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. माहिती नाही.

प्र.क्र. **३९** अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यांच्या तपासामध्ये असे निष्पन्न झाले आहे की, सदर गुन्हयामध्ये फिर्यादीने मुलाला घेऊन जाते असे म्हणाल्याचा राग आल्याने तुम्ही फिर्यादीला व तिच्या आईला लोखंडी रॉडने मारहाण करुन शिवीगाळ केली, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. **४०** अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, सदर गुन्हा तुम्ही केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांनी तुमच्याविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ४१ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ डॉ. सारंग अर्जुन बोरुडे यांच्या साक्षीत असे आले आहे की, सन २०१९-२०२० पासुन त्यांचे नागापुर, अहमदनगर येथे त्यांचे भैरवनाथ हॉस्पीटल आहे, तेथे ते वैद्यकिय व्यवसाय करतात, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. माहिती नाही.

प्र.क्र. ४२ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, दि. ०७/०९/२०२१ रोजी संगिता उल्हास ठोकळ व स्वाती सतिष वैराळ त्यांचे हॉस्पीटलमध्ये तपासणीसाठी आल्या होत्या, त्यांचे डोक्याला जखमा झालेल्या होत्या, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ४३ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, संगिता उल्हास ठोकळ हिचे वय ५० वर्षे होते, तिला डोक्याला आणि उजव्या भुवईच्यावर जखम झाली होती, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ४४ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, तिच्या डोक्याच्या जखमेला १६ टाके टाकले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ४५ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यांनी तिला पुढील उपचारासाठी दवाखान्यात भरती करुन घेतले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ४६ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, जखमा साध्या स्वरुपाच्या होत्या, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ४७ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की,

दवाखान्यातुन सुट्टी देताना त्यांनी तिला वैद्यकिय प्रमाणपत्र (नि.२९) दिले होते, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. माहिती नाही.

प्र.क्र. ४८ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यानंतर त्यांनी स्वाती सतिष वैराळ हिला तपासले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. माहित नाही.

प्र.क्र. ४९ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, तिला डोक्याला जखम झाली होती, तिला ७ टाके टाकले होते, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. माहिती नाही.

प्र.क्र. ५० अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यांनी तिला पुढील उपचारासाठी दवाखान्यात भरती करुन घेतले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. माहिती नाही.

प्र.क्र. ५१ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, जखम साध्या स्वरुपाची होती, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ५२ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, दवाखान्यातुन सुट्टी देताना त्यांनी तिला वैद्यकिय प्रमाणपत्र (नि.३०) दिले होते, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ५३ अभियोग पक्षाचे साक्षीदार तुमच्या विरुध्द साक्ष का देतात ?

उत्तर. माहिती नाही.

प्र.क्र. ५४ तुम्हाला शपथेवर जबाब दयावयाचा आहे का ?

उत्तर. नाही.

प्र.क्र. ५५ तुम्हाला बचावाचे साक्षीदार तपासावयाचे आहेत काय ?

उत्तर. नाही.

प्र.क्र. ५६ तुम्हाला या केसबाबत आणखी काही जादा सांगावयाचे आहे काय ?

उत्तर. काही नाही.

--------------

आरोपी क्र. १ ची सही / अंगठा

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN

Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.01.02 16:40:19 +0530

(एल. एस. पाढेण)

दिनांक : ०२/०१/२०२६

मुख्य न्यायदंडाधिकारी,
अहमदनगर.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, आरोपीचा जबाब माझ्या समक्ष नोंदविला असून त्यातील मजकूर हा आरोपीने कथन केल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे.

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN

Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.01.02 16:40:28 +0530

(एल. एस. पाढेण)

दिनांक : ०२/०१/२०२६

मुख्य न्यायदंडाधिकारी,
अहमदनगर.